स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# आरोग्य सेवा आयुक्तालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | Website : http://maha-arogya.gov.in |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| उपसंचालक (शुश्रृषा) | २२६२१००६<br>२२६२६७४० | Email : ddhsnursingmumbai@gmail.com |

| | |
|---|---|
| परिपत्रक / तात्काळ | क्र. आसेआ /शुश्रृषा/कक्ष-९/टे-१/ प्रवेशप्रक्रिया /सन २३-२४/ 4000 /२०२३<br>दि. 23 /०८/२०२३ |

प्रति,

१. जिल्हा शल्य चिकित्सक ( सर्व संबंधीत )

२. वैद्यकिय अधिक्षक जिल्हा स्त्री रुग्णालय ( संबंधीत )

३. वैद्यकिय अधिक्षक, सामान्य रुग्णालय( संबंधीत )

विषय - एएनएम व जीएनएम परिचर्या प्रशिक्षण केंद्रातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शक सुचना

संदर्भ- १) आयुक्तालयाचे पत्र क्र.संआसे/ शुश्रृषा/कक्ष-९/टे-४/एएनएम व जीएनएम प्रवेश प्रकिया सन २०२३-२४/३१४६/२३ दि.१४.०७.२०२३

२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश २०२३/प्र.क्र.५५३/सेवा-५ दि.२२.०८.२०२३

३ ) भारतीय उपचर्या परिषद यांचे इंग्रजी पत्र दि.१३.०४.२०२३

१) प्रवेश प्रकिया वेळापत्रकानुसार जिल्हयातील बहुवाचनीय वृत्तपत्रात जाहिरात देणे.

२) सदर जाहिरातीत फक्त अपंग, आशा व एएनएम या कर्मचा-याचा पात्रतेबाबत उल्लेख करणे. त्याच्यासाठी कुठे हि राखीव कोटयाचा उल्लेख करण्यात येवू नये.

३) प्रत्येक एएनएम व जीएनएम परिचर्या प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणासाठी नमुद करण्यात आलेल्या उपलब्ध जागाच जाहिरातीत देण्यात याव्यात .

४) सर्व अर्ज वाटप करतांना निवड नियमावली सोबत अर्ज अनुक्रमांकानुसार वाटप करावेत .

५) तसेच सर्व अर्ज जमा झाल्यावर त्याची गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी.

६) सदर गुणवत्ता यादी जोडण्यात आलेल्या निवड नियमावलीस धरुन तयार करण्यात यावी.

७) शैक्षणिक अर्हता प्राप्त आशा उमेदवाराची निवड तिच्या गुणवत्तेनुसार ग्राहय धरण्यात यावी. तसेच आशा उमेदवार ज्या प्रवर्गातील आहे त्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावा. तथापि आशा उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा खुल्या प्रवर्गातून निवड करण्यात यावा.

८) इंडियन नर्सिंग कौन्सीलच्या पत्र क्र.एफ.नं.१-५/२०१८, आयएनसी दि.१९.०८.२०१९ च्या परिपत्रकानुसार दिव्यांग उमेदवार उपलब्ध झाल्यास, सदर प्राप्त दिव्यांग उमेदवारांमधुन १ जागा खुल्या प्रवर्गा करिता व १ जागा राखीव प्रवर्गातून तो ज्या प्रवर्गात आहे त्यानुसार घेण्यात यावा.

९) एएनएम व जीएनएम परिचर्या प्रशिक्षण केंद्र ठाणे यांनी बृहन्मुंबई स्थित उमेदवारांनाही अर्ज वाटप करावेत.

१०) सर्व उमेदवारांची सामायिक निवड यादी (General Merit List ) तयार करण्यात यावी. तसेच सामायिक निवड यादी तयार करताना त्यांच्या नावांसमोर महिला उमेदवार, पुरुष उमेदवार ,आशा,एएनएम व अपंग उमेदवार असे नमुद करण्यात यावे.

११) तसेच महिला उमेदवार, पुरुष उमेदवार, आशा, एएनएम व अपंग उमेदवार यांच्या वेगवेळया यादया ही तयार करण्यात याव्यात.

१२) निवड यादी करताना प्रथम खुला उमेदवारांच्या संख्येनुसार सर्व उच्च गुणवत्ता प्राप्त उमेदवारांची निवड करण्यात यावी. सदर निवड प्रक्रियेत पुरुष ,उमेदवार आल्यास त्यांची आरक्षणानुसार निवड करावी.आरक्षणापेक्षा जास्त असेल तर त्या पुढील उमेदवाराचा विचार करण्यात यावा.अथवा कमी असल्यास आंतरगटातून पुढील प्रवर्गातील उपलब्ध उमेदवार घेण्यात यावा. परंतु कोणत्याहि परिस्थितीत प्रमाणकापेक्षा जास्त पुरुष उमेदवार होणार नाहित, याची दक्षता घेण्यात यावी .

१३) सर्व निवड व गुणवत्ता यादीवर समितीतील सर्व उपस्थितीतांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

१४) सर्व प्रवर्गनिहाय अर्ज वाटप, रद्द करण्यात आलेले अर्ज , प्राप्त झालेले व प्राप्त न झालेले अर्ज यांचा गोषवारा सोबत जोडण्यात यावा.

१५) तसेच जमा रकमेचा तपशिल ही सोबत जोडण्यात यावा.

१६) अपंग, आशा उमेदवार उपलब्ध झाले नसल्यास तसे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

१७) एएनएम व जीएनएम यांच्या सोबत जोडण्यात आलेल्या **तपशिलानुसार नस्ती** तयार करण्यात यावी. सदर नस्ती मध्ये जोडण्यात आलेली सर्व कागदपत्रे आडव्या ( Horizontal ) प्रपत्रात तयार करण्यात यावी.

तरी सदर परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, सोबतच्या वेळापत्रकाचे व शासन मान्यता प्राप्त प्रवेश नियमावलीचे तंतोतंत पालन करुन प्रवेश प्रकिया पुर्ण करुन तसा अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

( डॉ.नागनाथ मुदम )
उपसंचालक ( शुश्रृषा )आरोग्य सेवा मुंबई

प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव व माहितीस्तव -

१. परिचर्या अधिकारी, परिचर्या प्रशिक्षण केंद्र ( एएनएम व जीएनएम सर्व )

२.उपसंचालक , आरोग्य सेवा ( सर्व परिमंडळ )
२. प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ मुंबई.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -
मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग ( सेवा-५ ) मंत्रालय मुंबई.

# एएनएम व जीएनएम प्रवेश प्रकिया २०२३-२४

## प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १ | आयुक्तालयाने परिपत्रक निर्गमित करणे | दि. २३.०८. २०२३ |
| २ | सर्व संस्थामार्फत जाहिरात देणे. | दि. २४.०८. २०२३ |
| ३ | प्रवेश अर्ज वाटप करणे | दि. २४.०८.२०२३ ते दि. २८.०८.२३ |
| ४ | प्रवेश अर्ज स्विकारणे | दि. २४.०८.२०२३ ते दि. २९.०८.२०२३ |
| ५ | प्रवेश अर्जाची छाननी | दि. २४.०८.२०२३ ते दि. २९.०८.२०२३ |
| ६ | सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे . | दि. ३०.०८.२०२३ |
| ७ | सर्वसाधारण गुणवत्ता यादीबाबत आक्षेप नोंदविणे. | दि. ३१.०८.२०२३ |
| ८ | आक्षेपानंतरची अंतिम गुणवत्ता यादी | दि. ०१.०९.२०२३ |
| ९ | **प्रवेश समुपदेशन संवाद** | |
| अ | एएनएम | ०२.०९.२०२३ |
| ब | जीएनएम | ०४.०९.२०२३ |
| १० | राज्यस्तरीय समितीची प्रवेशाकरीता निवड यादीस अंतिम मान्यता घेणे ( पुणे/कोल्हापूर /धुळे /औरंगाबाद /लातूर/ लोखंडीसावरगाव/अकोला/बुलढाणा/ यवतमाळ/पुसद /नागपूर/वर्धा ) | दि. ११.०९.२०२३ |
| १० अ | राज्यस्तरीय समितीची प्रवेशाकरीता निवड यादीस अंतिम मान्यता घेणे (गोंदिया/गडचिरोली/भंडारा/चंद्रपूर/अमरावती/वाशिम/उस्मानाबाद /नांदेड/बीड/ हिंगोली/जालना/परभणी ) | दि. १२.०९.२०२३ |
| १० ब | राज्यस्तरीय समितीची प्रवेशाकरीता निवड यादीस अंतिम मान्यता घेणे. (ठाणे/रायगड/सातारा/सिंधुदुर्ग/रत्नागिरी/नाशिक/जळगाव/अहमदनगर/ नंदूरबार/ मालेगाव जि. नाशिक ) | दि. १३.०९.२०२३ |
| ११ | प्रशिक्षण संस्थास्तरावर निवड यादी प्रसिध्द करणे व निवड पत्र देणे. | दि.१५.०९.२०२३ |
| १२ | उमेदवार प्रशिक्षणासाठी हजर होणे व प्रशिक्षण सुरु करण्याचा दिनांक | दि.१८.०९.२०२३ |

# महाराष्ट्र शासन

# सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

**सहाय्यक परिचर्या प्रसाविका प्रशिक्षण**(ए.एन.एम.)

प्रशिक्षण कालावधी २ वर्षे

(फक्त महिला उमेदवारांकरिता)

# प्रवेश नियम पुस्तिका व प्रवेश अर्ज

# सन २०२३-२४

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड,मुंबई- ४०० ००१

संकेतस्थळ - http://arogya.maharashtra.gov.in

ईमेल - ddhsnursingmumbai@gmail.com

दुरध्वनी - ०२२- २२६२६७४०

**आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई**
**सहाय्यक परिचर्या प्रसाविका प्रशिक्षण (ए.एन.एम.)**
**प्रवेश प्रकिया सन २०२३-२४**

**सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांच्या अधिनस्थ असलेल्या परिचर्या प्रशिक्षण केंद्र येथे सहाय्यकारी परिचर्या प्रसाविका (ए.एन.एम.) या २ वर्ष पदविका अभ्यासक्रमाकरीता खालील कार्यपध्दती प्रसिध्द करण्यात येत आहे.**

१) **सामान्य:-** हे नियम महाराष्ट्र राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत सर्व परिचर्या प्रशिक्षण संस्थामधील दोन वर्षे कालावधीच्या “सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका” (ए.एन.एम.)प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागु राहतील.

२) **व्याख्या:-**

- राज्य शासन याचा अर्थ , महाराष्ट्र शासन होय.
- सार्वजनिक आरोग्य विभाग म्हणजे महाराष्ट्र राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण ते शहरी भागात प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, संर्वधनात्मक दर्जेदार सेवा पुरविण्यासाठी, विविध स्तरावर विविध योजना राबविण्यासाठी काम करणारा आरोग्य विभाग होय.
- आयुक्तालय म्हणजे आरोग्य सेवा आयुक्तालय होय.
- “आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक (राष्ट्रीय आरोग्य अभियान )" हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाचे प्रमुख होय.
- संचालक, आरोग्य सेवा , मुंबई हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील कार्यालय प्रमुख व सर्व विभागाचे प्रमुख होय.
- उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) म्हणजे आरोग्य सेवा आयुक्तालयांर्गत शुश्रृषा विभागाचे प्रमुख होय.
- सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) म्हणजे आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत शुश्रृषा विभागाच्या प्रमुखास सहाय्य करणारे होय.
- प्रवेश प्रक्रियेचे सक्षम प्राधिकारी (Competent Authority) म्हणजे राज्य स्तरावर आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक ( राष्ट्रीय आरोग्य अभियान ) यांच्या अध्यक्षतेखाली

गठीत केलेली समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती होय.

- “ सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका" (ए.एन.एम.) म्हणजे ग्रामिण भागात व्यक्ती, कुटुंब आणि समाजास शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि अध्यात्मिक अशा सर्वांगीण आरोग्य सेवा पुरविण्याकरीता (Comprehensive Services) परिचर्या प्रशिक्षण देणारा दोन वर्षाचा अभ्यासक्रम होय.
- उमेदवार म्हणजे बारावी (१०+२) विज्ञान उत्तीर्ण आणि या अभ्यासक्रमास प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थी होय.
- महाराष्ट्र शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई हे राज्य स्तरावर परिचर्या अभ्यासक्रम राबविणे, परिक्षा घेणे, गुणवत्ता नियमन करणारी शासनाच्या अधिनस्त स्वायत्त संस्था होय.
- महाराष्ट्र परिचर्या परिषद ,मुंबई हे राज्यस्तरावर परिचर्या प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणाची नोंदणी व नुतनीकरण करणारी शासनाच्या अधिनस्थ कार्यरत स्वायत्त संस्था होय.

## ३) प्रवेश प्रक्रियेचे सक्षम प्राधिकारी (Competent Authority):-

### राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रिया राबविणारी समिती:-

संपुर्ण प्रवेश प्रक्रियेचे आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान हे सक्षम प्राधिकारी राहतील.सक्षम प्राधिकारी त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यामार्फत जिल्हास्तरीय निवड समितीने केलेल्या प्रवेश प्रक्रियेची तपासणी करतील व प्रवेश प्रक्रियेस अंतिम मान्यता देतील. यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त केली आहे. प्रवेश प्रक्रियेबाबत कोणताही मुद्दा उपस्थित झाल्यास सक्षम प्राधिकारी (आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक ) निर्णय घेतील व त्यांचे निर्णय अंतिम असुन सर्व उमेदवारास बंधनकारक राहतील.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान | अध्यक्ष |
| मा.संचालक, आरोग्य सेवा | सदस्य |
| उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) | सदस्य सचिव |
| सहायक संचालक (शुश्रृषा) | सदस्य |
| मुख्य प्रशासकिय अधिकारी | सदस्य |

**जिल्हास्तरीय प्रवेश प्रक्रिया राबविणारी समिती:-**

जिल्हा स्तरावर निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासणी करीता शासनाने खालीलप्रमाणे समिती नियुक्त केली आहे.

१) जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकिय अधिक्षक — अध्यक्ष
२) अधिसेविका (संबंधीत रुग्णालय) — सदस्य
३) जिल्हा समाज कल्याण अधिकारी — सदस्य
४) प्रकल्प अधिकारी, (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) — सदस्य
५) मुख्य प्रशासकिय अधिकारी/प्रशासकिय अधिकारी (संबंधित रुग्णालय) — सदस्य
६) शुश्रृषा अधिकारी /वरिष्ठ पाठयनिर्देशिका — सदस्य सचिव

## ४) <u>जिल्हा निहाय जागा वाटप</u>:-

- सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्थ असलेल्या ३५ एएनएम परिचर्या प्रशिक्षण केंद्रामध्ये ४० या प्रमाणे जागा वाटप करण्यात आलेल्या आहेत.
- उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

| अ. क्र. | परिचर्या प्रशिक्षण संस्थाचे नाव | जागा | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा प्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | | १३.० % | ७.० % | ३.० % | २.५ % | ३.५ % | २.० % | २.० % | १९.०% | १०.० % | ३८% |
| १ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, कामा व आल्बेल्स रुग्णालय, मुंबई | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, ठाणे | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ३ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. रायगड | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ४ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. पुणे | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ५ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. सातारा | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |

| अ. क्र. | परिचर्या प्रशिक्षण संस्थाचे नाव | जागा | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा प्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. सिंधुदुर्ग | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ७ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. रत्नागिरी | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ८ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. कोल्हापुर | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ९ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. नाशिक | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १० | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. धुळे | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ११ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. जळगाव | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १२ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. अहमदनगर | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १३ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. नंदुरबार | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १४ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, सा.रु.मालेगाव जि. नाशिक | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १५ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. औरंगाबाद | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १६ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. जालना | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १७ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. परभणी | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १८ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. हिंगोली | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १९ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव जि.लातूर | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |

| अ. क्र. | परिचर्या प्रशिक्षण संस्थाचे नाव | जागा | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा प्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.बीड | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २१ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, लोखंडी सावरगाव जि. बीड | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २२ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.नांदेड | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २३ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.उस्मानाबाद | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २४ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.स्त्री.रु.अकोला | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २५ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.वाशिम | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २६ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.स्त्री.रु.अमरावती | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २७ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.बुलढाणा | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २८ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.यवतमाळ | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २९ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, उपजिरु पुसद जि.यवतमाळ | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ३० | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, डागा रुग्णा.नागपुर | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ३१ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.चंद्रपुर | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ३२ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.भंडारा | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |

| अ. क्र. | परिचर्या प्रशिक्षण संस्थाचे नाव | जागा | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा प्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३३ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.गडचिरोली | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ३४ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.गोंदिया | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ३५ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.वर्धा | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |

टिप - अपंग व्यक्तिंसाठी एकूण जागांपैकी ५ टक्के जागा आरक्षित असेल तसेच अनाथ व्यक्ति करीता अनाथ पदाची गणना पदभरतीच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध पदसंख्येच्या १% राहील.
(शासन निर्णय क्रमांक - अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दि. २३.८.२०२१)

## ५) प्रवेशित जागांचे आरक्षण:-

- सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्थ असलेल्या ३५ एएनएम परिचर्या प्रशिक्षण केंद्रामध्ये सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासुन प्रवेश प्रक्रिया राबविताना शासनाने विहित केलेल्या शैक्षणिक आरक्षणानुसार आरक्षण ठेवण्यात आलेले आहे.
- शैक्षणिक अर्हता प्राप्त आशा उमेदवारांसाठी २ जागा राखीव असतील त्यांची निवड त्यांच्या गुणवत्तेनुसार करण्यात यावी. आशा उमेदवारांसाठी त्यांची सलग तीन वर्ष सेवा होणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्यात समबंध आल्यास ज्याचे तीन वर्षाचे एकत्रित मानधान जास्त राहील अशा आशा उमेदवारांची निवड करण्यात येईल.
- अपंग आरक्षण :-

  इंडियन नर्सिंग कॉन्सिलच्या पत्र क्र. एफनं.१-५/२०१८आयएनसी दि.१९.०४.२०१९ च्या परिपत्रकानुसार "For Disabled candidates: ५% Disablity of locomotor to the tune of ४०% to ५०% of the lower extremity". या अपंग आरक्षणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

## ६) प्रवेश अर्ज शुल्क आकारणी:-

a) प्रवेश अर्ज शुल्क- खुला प्रवर्गासाठी रु. ४००/- (रुपये चारशे फक्त)
राखीव प्रवर्गासाठी रु.२००/- (रुपये दोनशे फक्त)

निवड झालेल्या उमेदवारांना भोजन खर्च, पुस्तके, स्टेशनरी, गणवेश इत्यादी खर्च स्वत: करावा लागेल, तसेच नोंदणी शुल्क,(Enrolment fees) परिक्षा शुल्क, एसएनए सदस्यता विहित शुल्क संस्थेत भरणा करावा लागेल.

b) **शैक्षणिक शुल्क** -

या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या दरानुसार राहील. निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम सत्राचे अभ्यासक्रम शुल्क प्रवेशाच्या वेळीच भरावे लागेल. त्यानंतर प्रत्येक सत्राच्या प्रारंभी निर्धारित शुल्क भरावे लागेल. प्रवेश शुल्क भरल्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्राहय धरल्या जाईल.

शैक्षणिक शुल्क वैद्यकिय शिक्षण व संशोधन, शासन निर्णय क्रमांक एएमसी१००७/६२८/प्र.क्र.१४८/०७/शिक्षण २ दि.०१.०३.२०११ प्रमाणे आकारण्यात येते त्यानुसार या शैक्षणिक वर्षापासुन एएनएम व जीएनएम या अभ्यासक्रमासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क घेण्यात यावे.

| अ.क्र. | शैक्षणिक शुल्काचा तपशिल | शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | रु.१५००/- |
| २ | पाठय शुल्क | रु.१०५०/- |
| ३ | ग्रंथालय अनामत ( परतावा योग्य) | रु. २०००/- |
| ४ | वस्तीगृह भाडे | रु.४०००/- |
| ५ | जिमखाना / कल्चरल शुल्क (वार्षिक) | रु.५००/- |
| ६ | ग्रथांलय शुल्क (वार्षिक) | रु. १०००/- |
| ७ | संकिर्ण (वार्षिक) | रु५००/- |
| | **एकुण** | **रु.१०५५०/-** |

## ७) शैक्षणिक अर्हता:-

- शासन पत्र क्रमांक प्रवेश-२०२३/प्र.क्र.४४०/से-५ दि. १५.०६.२०२३ नुसार, एएनएम या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सर्वसाधारण तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी देखिल बारावी विज्ञान शाखेत ( जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र सह ) किमान ४५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक असेल.

## ८) <u>निवड झालेल्या उमेदवारांना कागदपडताळणी करीता सादर करावयाची कागदपत्रे</u>:-

- शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा दाखला
- १० वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- अर्हताकारी परिक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले त्याबाबतचे शाळा/ महाविद्यालयाचे प्रमाणपत्र ( Attempt Certificate)
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
- भारतीय नागरिकत्वाचा दाखला (Nationality Certificate)
- जात प्रमाणपत्र
- जातवैद्यता
- नॉन क्रिमीलेअर दाखला
- शासकिय रुग्णालयातील सक्षम वैद्यकिय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले वैद्यकिय प्रमाणपत्र ( सोबतच्या विहित नमुन्यानुसार)
- आधार कार्ड
- राखीव गटातील उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करावीत.

वरील सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती प्रवेशाच्या वेळी आणणे आवश्यक आहे. तसेच समुपदेशनाच्या वेळी सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रतीची छाननी करण्यात येईल.

**सहायक परिचारीका प्रसाविका ( एएनएम ) हा अभ्यासक्रम पुर्णवेळ व नियमित असल्याने सदर प्रशिक्षणादरम्यान इतर कोणत्याही शैक्षणिक अभ्यासक्रमास प्रवेश घेता येणार नाही.**

## ९) <u>वयोमर्यादा</u>:-

दि.३१.०८.२०२३ रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त असु नये.

## १०) <u>गुणवत्ता</u>:-

प्राप्त झालेल्या पात्र अर्जातुन उमेदवारांची निवड अर्हता परिक्षेत मिळविलेल्या एकुण गुणांवर आधारीत गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

### <u>समबंध</u>:-

एकापेक्षा जास्त उमेदवारांचे समान गुण झाल्यास त्यामधुन उमेदवारांची गुणानुक्रमे निवड ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात येईल.

- प्रथम प्राधान्यक्रम जो उमेदवार १२ वी विज्ञान शाखेतील फिजिक्स, केमिस्ट्री व बायोलॉजी या शास्त्र विषयामध्ये एकत्रिक गुण जास्त असलेल्या उमेदवारास राहील.
- द्वितीय प्राधान्यक्रम ज्या उमेदवाराचे १२ वी परिक्षेतील इंग्रजीविषयाचे जास्त गुण असतील त्यास राहील.
- तृतीय प्राधान्यक्रम ज्या उमेदवाराचे १० वी परिक्षेतील एकुण गुण जास्त असतील त्यास राहील.

**राखीव उमेदवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण असेल -**

| अ.क्र. | प्रवर्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व बौध्द धर्मातरीत अनुसूचित जाती ( अ.जा ) | १३.० |
| २ | अनुसूचित जमाती ( निर्देशित क्षेत्रांच्या बाहेर राहणा-यांसह ) ( अ.ज. ) | ७.० |
| ३ | निरधि सूचित जमाती ( अ ) विमुक्त जाती ) वि.जा. ( अ) | ३.० |
| ४ | भटक्या जमाती - (ब) भ.ज. ( ब) | २.५ |
| ५ | भटक्या जमाती - (क) भ.ज. ( क) | ३.५ |
| ६ | भटक्या जमाती - (ड) भ.ज. ( ड) | २.० |
| ७ | इतर मागास वर्ग ( इमाव ) | १९.० |
| ८ | आर्थिक दुर्बल घटक | १०.० |

- **आंतर प्रवर्ग गट - ( Inter-se merit )**

**गट - १**

१ ) अ.जा. व बौध्द धर्मातरीत राहतील

२ ) अ.ज.( निर्देशित क्षेत्रांच्या बाहेर राहणा-यांसह )

**गट - २**

१ ) वि.जा. ( अ)

२ ) भ.ज. ( ब)

**गट -३**

१ ) भ.ज. ( क)

२ ) भ.ज. ( ड)

३) इ.मा.व.

## ११) वसतीगृह सुविधा:-

परिचर्या प्रशिक्षण केंद्रातील एएनएम प्रशिक्षणार्थीना वसतीगृहात राहणे बंधनकारक आहे. तथापि ज्या वसतीगृहातील इमारत राहण्यायोग्य नसेल त्या ठिकाणी पर्यायी शासकिय इमारत / कर्मचारी शासकिय निवासस्थान उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रयत्न करावेत. अगदीच अशक्य झाल्यास संबंधित विद्यार्थ्यानीच्या पालकांनी त्यांच्या जबाबदारीवर वसतीगृहात न राहणे हा पर्याय स्वीकारला तर त्याबाबत रितसर पालकांच्या परवानगी व संमतीपत्रानुसार त्यांना घरी अनिवासी प्रशिक्षणाची अनुमती देण्यात यावी.

जेवणाची सोय पुर्णत: शासनाकडुन होणार नाही जेवणासाठी विद्यार्थिनीना क्लब सिस्टीम द्वारे ठरवुन प्रतिमहा ठराविक रक्कम एकत्रिक (अंदाजे रु.१०००/- ते रु.१५००/-) जमा करुन शासनाच्या स्वयंपाकी यांचे कडुन स्वयंपाक करवुन घेतला जाईल.

- विद्यार्थ्यांचा आहाराचा दर्जा राखण्यासाठी खालीलप्रमाणे आहार समिती गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| अधिसेविका | अध्यक्ष |
| परिचर्या अधिकारी/वरिष्ठ पाठयनिर्देशिका | सदस्य |
| सहाय्यक अधिसेविका | सदस्य |
| रुग्णालयाचे आहार तज्ञ | सदस्य |
| वॉर्डन | सदस्य सचिव |
| विद्यार्थी प्रतिनिधी | सदस्य |

या समितीने विद्यार्थ्यांचे दैनंदिन आहार नियोजन व खर्चाचा ताळमेळ ठेवावा व त्याबाबतच्या नोंदी अद्यावत ठेवाव्यात. यासाठी परिचर्या प्रशिक्षण केंद्र उपहारगृह या नावाने परिचर्या अधिकारी व विद्यार्थी प्रतिनिधी यांचे संयुक्त बॅक खाते उघडावे. दैनंदिन आहार नियोजनावर सर्व समिती सदस्यांच्या सहया बंधनकारक आहेत.

- वसतीगृहाचे दरवाजे साधारणतः कामकाजाचे तास पाहुन रात्री ८ नंतर बंद करावेत. त्यानंतर कोणासही प्रवेश देण्यात येऊ नये.
- दररोज सकाळी ७.३० व सकाळी ८ वाजता वसतिगृहात प्रार्थना, परिचर्या प्रतिज्ञा व राष्ट्रगीत घेऊन विद्यार्थ्यीनींची हजेरी घेऊन नोंद ठेवावी.

## १२) <u>विद्यावेतन</u>:-

निवड झालेल्या प्रशिक्षणार्थिंना शासन नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेले विद्यावेतन दरमहा दिले जाईल.

## १३) <u>शिस्त व वर्तणुक</u>:-

### <u>(अ)प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षण केंद्र व रुग्णालयात पाळावयाचे नियम</u>:-

परिचर्या प्रशिक्षण हा अभ्यासक्रम इतर अभ्यासक्रमापेक्षा पुर्णतः वेगळा आहे . त्याअनुषंगाने परिचर्या प्रशिक्षण केंद्रात विहित केलेले नियम प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना बंधनकारक आहेत. प्रत्यक्ष रुग्णावर प्रात्याक्षिक करावे लागते त्यामुळे प्रत्येक विद्यार्थिनीने परिचर्या अभ्यासक्रम जबाबदारीने पुर्ण करणे आवश्यक आहे.यासाठी पालकांनी आपल्या पाल्याकडुन खालील नियमांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी. तसे प्रतिज्ञापत्र विद्यार्थ्यी व पालकांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रवेश घेते वेळी सादर करावे.

१) विद्यार्थ्यांविरुध्द कोणत्याही गुन्हयाची नोंद किंवा न्यायलयीन प्रकरण प्रलंबीत असु नये याबाबत खोटी माहिती दिल्याचे आढळुन आल्यास प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणातुन काढुन टाकण्यात येईल.

२) विद्यार्थ्यांनींना वर्गात व रुग्णालयामध्ये मोबाईल फोन वापरण्यास सक्त मनाई आहे.

३) महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी नेमुन दिलेल्या रजे व्यतिरीक्त कोणतीही रजा अनुज्ञेय राहणार नाही. तसेच प्रशिक्षण कालावधीत विवाह / गरोदरपण असल्यास विहीत कालावधीत प्रशिक्षण पुर्ण करणे हि सर्वस्वी प्रशिक्षणार्थीची जबाबदारी राहील.

४) विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कालावधीत वारंवार सुट्टीवर जाऊ नये व पालाकांनी त्यासाठी दबाव आणू नये.

५) विद्यार्थी प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही कारणास्तव लेक्चरला गैरहजर असल्यास तसेच परिक्षेसाठी उपस्थितीचे दिवस कमी पडल्यास तिला/त्याला महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ नियमानुसार परिक्षेला बसता येणार नाही.

६) भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या नियमांचे पालन विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

७) शैक्षणिक सहली,भेटी, ग्रामिण अनुभव, आऊटपास इ. साठी बाहेर गेल्यावर एखादी दुर्घटना घडल्यास त्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

८) प्रशिक्षणा दरम्यान विद्यार्थ्यांनीने कोणतेही बेकायदेशीर/अनैतिक कृत्य केल्यास त्या विद्यार्थिनीवर त्याची संपुर्ण जबाबदारी वैयक्तिकरित्या राहील व तिला प्रशिक्षणातुन काढण्यात येईल. तसे अधिकार संस्थाप्रमुखांना असतील.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०२/०४/२००८ च्या आदेशान्वये लिंगडोह समितीच्या रॅगिंग विरोधी शिफारसीनुसार तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४.१२.२००९ च्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

- प्रशिक्षणार्थी/ विद्यार्थी रॅगिंगच्या कृत्यामध्ये दोषी आढळल्यास त्याला निलंबित केले जाईल. तसे शपथपत्र लिहुन घेतले जाईल.
- खालील प्रमाणे रॅगिंग विरोधी समिती गठीत आहे.

| | |
|---|---|
| जिल्हा शल्य चिकित्सक | अध्यक्ष |
| अधिसेविका | सदस्य |
| परिचर्या अधिकारी | सदस्य सचिव |

- नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना उपरोक्त समिती सदस्यांचे दुरध्वनी क्रमांक दिले जातील.

महाराष्ट्र शासनाच्या सन १९९९ च्या रॅगिंग विरोधी कायद्याचे पालन करणे सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे.

९) अतंर्गत मुल्यमापनाकरिता वेळोवेळी चाचणी परिक्षा, केसस्टडी, केस प्रेझेंटेशन , नर्सिंग केअर प्लान, प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादी घेतल्या जातील, त्या वेळोवेळी पुर्ण करणे बंधनकारक राहील. त्यामध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, अन्यथा अंतिम परिक्षेस बसता येणार नाही.

१०) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी दर ६ महिन्यांनी एक या प्रमाणे एका शैक्षणिक वर्षात किमान २ पालक सभा घेण्यात येतील. यासाठी पालकांनी उपस्थितीत राहणे बंधनकारक राहील.

११) विना परवानगी घरी राहील्यास १ दिवस गैरहजेरीसाठी १:१ याप्रमाणात वार्षिक रजा कपात करण्यात येईल.

१२) मंजुर सुट्टीपेक्षा जास्त दिवस गैरहजर असल्यास पुन्हा प्रशिक्षणाकरिता हजर होताना पालकांनी स्वतः प्रशिक्षणार्थ्यास प्राचार्यासमक्ष आणुन हजर करावे.

१३) प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला वर्ग व आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवणे. तसेच वर्गाच्या व इमारतीच्या भिंतीवर लिखाण करु नये, रंग उडवु नये. (विशेषतः धुलीवंदनाच्या दिवशी )

१४) नेमुन दिलेल्या वॉर्ड व्यतिरीक्त इतरत्र फिरु नये. तसेच सुटटी असेल तेव्हा रुग्णालयामध्ये अथवा रुग्णालयाच्या आवारामध्ये विनाकारण फिरु नये.

१५) सर्व विद्यार्थ्यांनी वॉर्ड मधुन वेळेत क्लासरुममध्ये येण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील.

१६) कक्ष अनुभव घेण्यासाठी कक्षात जाताना संपुर्ण गणवेशामध्येच जावे. यामध्ये सफेद सलवार कमीज , ॲप्रन, सफेद बुट, पायमोजे व पाउच मध्ये सर्व शैक्षणिक साहित्य असणे अनविार्य आहे.

१७) सर्व प्रशिक्षाणार्थ्यीचे दर महिन्याला तिस-या शनिवारी मानसोपचारतज्ञ यांचेकडुन समुपदेशन करण्यात येईल. तसेच प्रशिक्षणार्थ्यींना त्यांच्या काही वैयक्तिक बाबी तसेच कुठल्याही प्रकारची गंभीर समस्या किंवा मानसिक त्रास जाणवल्यास त्याबाबत त्यांनी आई, वडील, सेस्थेतील वरिष्ठ अधिकारी किंवा मानसोपचार तज्ञ यांच्याकडुन समुपदेशन करुन घेण्यात येईल.

१८) प्रशिक्षाणार्थ्यीना प्रात्यक्षिक अनुभव, प्रशिक्षण केंद्र तसेच वसतिगृहा संबंधित काही समस्या असल्यास त्वरीत संबंधित वरिष्ठांशी संपर्क साधावा.

१९) प्रशिक्षणार्थ्यीच्या आई वडीलांनी वेळोवेळी आपल्या पाल्यांच्या संपर्कात राहुन यशस्वीरित्या प्रशिक्षण पुर्ण करण्यासाठी त्यांचे मनोबल वाढवावे. तसेच आपल्या पाल्यांना प्रशिक्षणासंबंधित काही समस्या आहे असे आढळुन आल्यास ताबडतोब संस्थेतील वरिष्ठ अधिका-यांशी त्वरीत संपर्क साधावा.**तसेच पाल्यांना ॲनड्राईड मोबाईल देण्यात येवू नयेत.**

२०) प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण काळात त्यांच्या वर्तणुकीमुळे संस्थेला त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**<u>(ब) प्रशिक्षणादरम्यान वसतिगृहात पाळावयाचे नियम</u>**

१) वसतिगृहाचा वापर फक्त विद्यार्थ्यीनीसाठीच आहे. इतर कोणत्याही व्यक्तींना वसतीगृहात राहण्यास सक्त मनाई आहे.

२) नातेवाईंकांनी भेटावयाचे नियम.

- विद्यार्थ्याला भेटायला येणा-या नातेवाईकांची नावे, पत्ते व फोटो, आधारनंबरसहित प्रशिक्षणासाठी हजर होताना देणे आवश्यक आहे. तसेच त्याच नातेवाईकांना भेटण्यास परवानगी देण्यात येईल, त्या व्यक्तीरिक्त इतर कोणासही भेटण्यास परवानगी मिळणार नाही व यासाठी कोणाचाही दबाब आणु नये.
- नातेवाईकांनी भेटावयाची वेळ आठवडयातुन दोन वेळा सायंकाळी ४ ते ६ व रविवारी सकाळी १० ते ६ या वेळेतच विद्यार्थ्यांना प्रतिक्षा दालनात भेटता येईल.
- तसेच आठवडयातुन एक दिवस विद्यार्थ्यांना ३ तासाचा आऊट पास देण्यात येईल.

- रुग्णालय परिसरामध्ये नातेवाईकांशी बोलत राहु नये. प्रशिक्षणार्थींना वसतिगृहात भेटण्यासाठी आई वडिल व सख्खे भावंड यांनाच परवानगी असेल व प्रत्येक भेटीची नोंद रजिस्टरमध्ये घेण्यात यावी. नातेवाईकांचे ओळखपत्र तपासूनच त्यांना प्रशिक्षणार्थींना भेटण्यास परवानगी देण्यात येईल.

३) विद्यार्थ्यांना आपल्या नातेवाईकास/मैत्रिणीस वसतिगृहातील खोलीत नेण्यास सक्त मनाई आहे.

४) वसतिगृहातील टेरेसला कुलुप असावे व त्याची चावी अधिसेविका/परिचर्या अधिकारी यांच्या ताब्यात असेल .

५) वसतिगृहात विजेची शेगडी व विद्युत उपकरणे वापरण्यास सक्तमनाई आहे. प्रशिक्षणार्थींनी खोलीमध्ये कोणत्याही प्रकारची अपायकारक वस्तू/ हत्यारे ठेवू नयेत तसे आढळल्यास सक्त कारवाई करण्यात येईल .

६) विद्यार्थ्याला एखादा गंभीर आजार असल्यास उदा. अपस्मार, गर्भाशय व मासिक पाळी संबंधित आजार, त्वचेचे आजार असल्यास विद्यार्थी व पालकांनी प्रवेशाच्यावेळी संस्थेला अवगत करावे.

७) आजारी विद्यार्थ्यांने वेळेत वर्गशिक्षक,सार्वजनिक आरोग्य परिचारीका, वॉर्डन यांना सुचित करुन उपचार करुन घेणे. एकटे रुमवर झोपुन राहु नये. विद्यार्थ्यांनीला ॲडमीट केल्यास पालकांना बोलविण्यात येईल. पालकांनी त्वरीत आपल्या पाल्याला भेटण्यास यावे.

८) सांसर्गिक रोग झाल्यास वसतिगृहातुन उपचारासाठी घरी पाठविण्यात येईल व रोग बरा झाल्याचे वैद्यकिय अधिका-याचे पत्र असल्याशिवाय हजर करुन घेतले जाणार नाही.

९) प्रशिक्षण काळात वैयक्तिक साहित्याची चोरी किंवा आपापसात झालेल्या भांडणाची पोलीस तक्रार वरिष्ठांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही.

१०) रुम काही कारणास्तव बदलावयाची असल्यास वॉर्डनला लेखी अर्ज करुन बदलुन घेता येईल.

११) वसतिगृहातील रिक्त खोल्यांना तसेच विनावापर खोल्यांनाही अंभ्यगत कक्ष ( visiting room ) आणि चेजिंग रुम यांनाही रात्री ८ नंतर कुलुप असावे व त्यांच्या किल्या वार्डनच्या ताब्यात असतील .

१२) रात्री १० वाजता वॉर्डन व कार्यरत नाईट सुपर यांनी वसतिगृहात रांऊड घेतील व सर्व विद्यार्थ्यीनी सुखरुप आहेत हे पहातील . तसेच आठवडयातुन एक दिवस वॉर्डन व सहाय्यक अधिसेविका यांनी प्रशिक्षणार्थींच्या वसतीगृहातील खोल्यांची तपासणी करतील .

१३) सुरक्षिततेच्या कारणास्तव वसतिगृहाच्या आवारात (प्रवेशद्वार, अभ्यागत कक्ष, मेस व जेवणाची खोली, प्रत्येक मजल्यावरील व्हरांडा इ.) सी.सी.टीव्हीची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

१४) वसतिगृहामध्ये तक्रार पेटी ठेवण्यात आलेली असून प्राप्त झालेल्या तक्रारीचे तक्रार निवारण समितीमार्फत वेळोवेळी निवारण करण्यात येईल .

१५) वसतिगृहामध्ये प्रशिक्षणार्थीशी संबंधित असलेल्या नोंदी (आहार पुस्तक, हजेरी पुस्तक, आऊट पास व नाईट पास यांचे पुस्तक, पालक भेटीचे पुस्तक, जमा खर्चाचे पुस्तक इत्यादी) वॉर्डन वेळोवेळी अद्यावत करतील .

१६) वसतिगृहामध्ये कुठेही तोडफोड / नासधुस करण्यास सक्त कारवाई करण्यात येईल.

१७) वसतिगृहात कोणत्याही स्वरुपाचा गोंधळ करु नये.

## १८) <u>मेसमध्ये पाळावयाचे नियम.</u>

- सकाळी ७ ते ७:३० या वेळेतच चहा नाश्ता मिळेल.
- दुपारी ठरवुन दिलेल्या वेळेतच (१२ ते १) जेवण मिळेल.
- संध्याकाळचा चहा ४ ते ५ या वेळेतच मिळेल.
- रात्रीचे जेवण केवळ संध्याकाळी ७ ते ८ यावेळेतच मिळेल.
- जेवण केवळ आहारगृहातच करावे. रुमवर जेवण घेऊन जाऊ नये.
- आवश्यक असेल तेवढेच अन्न घ्यावे. अन्न वाया घालवु नये.
- उरलेले अन्न कचरा डब्ब्यामध्येच टाकावे. इतरत्र फेकु नये.
- मेस फी दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मेस क्लब मध्ये जमा करावी.

१९) पाण्याचा व विजेचा वापर काटकसरीने व आवश्यक तेवढा करावा. काम झाल्यावर नळ, पंखा व लाईट बंद करावेत.

२०) वसतिगृह आपले असल्यामुळे स्वच्छता ठेवावी. बाथरुम तुंबणार नाही याची काळजी घ्यावी.

## १४) <u>विद्यार्थ्यांचे स्थानांतर</u>:-

एका संस्थेत प्रवेश दिल्यानंतर प्रशिक्षण पुर्ण, होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना दुस-या संस्थेत स्थानांतर करता येणार नाही.

## १५) <u>विशेष सुचना</u>:-

- उमेदवाराना प्रवेशाच्या वेळी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित (ॲटेस्टेड) सत्यप्रती सादर कराव्यात. मुळ प्रमाणपत्रे प्रवेशाच्या वेळी पडताळणी करिता संस्थाप्रमुखांना सादर करावीत. एनरॉलमेंट/ आवश्यक पडताळणीनंतर मुळप्रमाणपत्रे उमेदवारास परत करण्यात येतील. मुळ प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांच्या छानननी किंवा पडताळणीच्या वेळी कोणत्याही त्रुटी, चुकीची माहिती किंवा गुणपत्रिकेत अनधिकृत खाडाखोड अथवा बदल केल्याचे आढळुन आल्यास संबंधित

उमेदवाराचा अर्ज तात्काळ नाकारण्यात येईल. किंबहुना त्याला आधिच प्रवेश देण्यात आला असल्यास तो रद्द करण्यात येईल. प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे मुळ प्रमाणपत्रे हे कार्यालयात जमा करुन घेण्यात यावीत. कोणत्याही सबबीवर एनरॉलमेंट पुर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांना मुळ प्रमाणपत्रे परत देण्यात येवु नये. याची नोंद प्राचार्यानी घ्यावी.

- प्रवेशासाठी केलेल्या दाव्यानुसार आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे प्रवेशाच्यावेळी सादर करण्यात यावी. प्रवेश अर्जात केलेल्या दाव्याव्यतिरिक्त नंतर केलेला कोणताही दावा विचारात घेण्यात येणार नाही.
- प्रशिक्षणाकरीता पात्र ठरविण्यात आलेला उमदेवार शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. यारिता ज्या संस्थतेत उमेदवाराने अर्ज केलेला असेल, त्याच संस्थेत त्याची वैद्यकिय तपासणी केल्यानंतरच उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र ठरेल. वैद्यकियतपासणीत उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया अपात्र ठरल्यास प्रशिक्षणातुन काढुन टाकण्यात येईल. सदर तपासणी संस्था प्रमुखांनी एक महिन्यात करुन घेणे बंधनकारक राहील.
- एखादा प्रशिक्षणार्थी अर्धवट प्रशिक्षण सोडुन गेल्यास प्रशिक्षणाच्या मध्यावर दुस-याप्रशिक्षणार्थीलाप्रवेश देणे शक्य नसते,अशा प्रकारे जागा रिक्त राहून एका होतकरु गरजवंत उमेदवाराचे शैक्षणिक नुकसान होते. यास्तव प्रशिक्षण अर्धवट सोडुन गेल्यास व कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास **“लॅप्स ऑफ सीट”**चे शुल्क रु.२५,०००/- इतकी रक्कम दंड म्हणून वसुल करण्यात येईल.व सदर शुल्काची शासन पावती देण्यात येईल.

*************************

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

## सहायक परिचर्या प्रसाविका (ए .एन.एम .)(कालावधी २ वर्ष )

## (महिला उमेदवारांकरिता )

## प्रवेश अर्ज

## सन २०२३-२४

प्रवेश अर्ज क्र

Paste a 3.5cm ×4.5 cm Size recent photograph only

प्रवेश अर्ज मूल्य : रु ४००/(खुल्या प्रवर्गाकरीता )
प्रवेश अर्ज मूल्य : रु २००/(राखीव प्रवर्गाकरीता )

---

**विशेष सूचना**- अ) अर्जदाराने अर्जातील प्रत्येक नोंद योग्य , संपूर्णपणे सुवाच्य व स्वहस्ताक्षरात भरणे आवश्यक आहे व अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकीत (अटेस्टेड) प्रती जोडलेल्या असाव्यात

ब ) प्रवेश अर्जात खाडाखोड करण्यात येऊ नये.

---

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

२) आईचे नाव :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

३) जन्म तारीख :- . . . . . . . . . . . . वय (३१ जुलै २०२३ रोजी ) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

४) स्थानिक पत्ता :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ईमेल:-.. . . . . . . . . . . . . . . . . .

कायमचा पत्ता :- ( स्थानिक पत्ता पेक्षा वेगळा असल्यास ) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

५) राष्ट्रीयत्व :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

६) आपण महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात काय ? होय / नाही . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

अधिवास प्रमाणपत्र क्रमांक :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

अधिवास प्रमाणपत्र मिळाल्याचा दिनांक:- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

७) जातीचा तपशील :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

जातीचे नाव :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . प्रवर्ग :-. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

८) वैवाहिक स्थिति :- अविवाहित / विवाहित/ घटस्फोटीत . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

विवाहित असल्यास पतीचे नाव , पत्ता , व दूरध्वनी क्रमांक :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

९) वडील / पालक / पती यांचा व्यवसाय :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . .

१०) शैक्षणिक अहर्ता :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

| अक्र | अहर्ता | शाखा | मंडळ/ विद्यापीठ | निकालाची तारीख | प्रयत्न | एकुण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १० वी (ssc) | | | | | | | | |
| २ | १२ वी (HSC) | | | | | | | | |
| ३ | पदवी | | | | | | | | |

११) वर्तणूकीबाबत प्रमाणपत्रदेणा-या दोन व्यक्ति ची नावे व पत्ता :-

( वर्तणूक प्रमाणपत्र जोडावीत )

१)

२)

अर्जदाराची सही, पूर्ण नाव व दिनांक

## CERTIFICATE OF MEDICAL FITNESS

This is to certify that I have conducted clinical examination ofKum. ........................................................................................ whois desirous of admission to Nursing courses

He/she has not given any personal history of any disease incapacitating him/her to undergo the professional course. Also, on clinical examination it has been found that he/she is medically fit to undergo said course.

a) Absence of any incapacitating and /or progressive systemic disease / disorder/ condition,
b) Absence of any disability of upper limb/s,
c) Absence of any major visual/auditory disability,
d) Absence of psychosis/neurosis/mental retardation,
e) Ability to maintain erect posture,
f) Reasonable manual dexterity.

| | |
|---|---|
| Adress of the Registered Medical Practitioner<br><br><br>Date - / /2023 | Signature |
| | Name |
| | Registration No |
| | Seal of Registered Medical Practitioner |

Note:

A candidate must be medically fit to undergo Fellowship/Certificate Course applied for. The medical
fitness must be certified by a Registered Medical Practitioner in the prescribed Performa, as given above
on a Letter head.

# महाराष्ट्र शासन

# सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

**सामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण** (जी.एन.एम.)

प्रशिक्षण कालावधी ३ वर्षे

(महिला व पुरुष उमेदवारांकरिता)

# प्रवेश नियम पुस्तिकाव प्रवेश अर्ज

# सन २०२३-२४

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड,मुंबई- ४०० ००१

संकेतस्थळ - http://arogya.maharashtra.gov.in

ईमेल - ddhsnursingmumbai@gmail.com

दुरध्वनी - ०२२- २२६२६७४०

**आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई**
**सामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण (जी.एन.एम.)**
**प्रवेश प्रकिया सन २०२३-२४**

**सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या परिचर्या प्रशिक्षण केंद्र येथेसामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण (जी.एन.एम.) या ३ वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या जागांवर प्रवेश करण्यासाठी खालील कार्यपध्दती प्रसिध्द करण्यात येत आहे.**

१) **सामान्य** :- हे नियम महाराष्ट्र राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत सर्व परिचर्या प्रशिक्षण संस्थामधील तीन वर्षे कालावधीच्या “सामान्य परिचर्या व प्रसाविका” (जी.एन.एम.)प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागु राहतील.

२) **व्याख्याः-**

- “राज्य शासन" याचा अर्थ , महाराष्ट्र शासन होय.
- “सार्वजनिक आरोग्य विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य शासनाच्या अधिनस्त ग्रामीण ते शहरी भागात प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, संर्वधनात्मक दर्जेदार सेवा पुरविण्यासाठी, विविध स्तरावर विविध योजना राबविण्यासाठी काम करणारा आरोग्य विभाग होय.
- “आयुक्तालय" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा आयुक्तालय होय.
- “आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक (राष्ट्रीय आरोग्य अभियान )" हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाचे प्रमुख होय.
- संचालक, आरोग्य सेवा, मुंबई हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील कार्यालय प्रमुख व सर्व विभागाचे प्रमुख होय.
- उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील शुश्रृषा विभागाचे प्रमुख होय.
- सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील शुश्रृषा विभाग प्रमुखास सहाय्य करणारे होय.
- प्रवेश प्रक्रियेचे सक्षम प्राधिकारी (Competent Authority) म्हणजे राज्य स्तरावर आयुक्त (आरोग्य सेवा) व अभियान संचालक (राष्ट्रीय आरोग्य अभियान ) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती आणि जिल्हास्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती होय.

- "सामान्य परिचारीका प्रसाविका" म्हणजे ग्रामिण ते शहरी भागात प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, संवर्धनात्मक दर्जेदार सेवा पुरविण्यासाठी, व्यक्ती, कुटुंब आणि समाजास शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि अध्यात्मिक अशा सर्वांगीण आरोग्य सेवा देण्याचे परिचर्या प्रशिक्षण देणारा तीन वर्षाचा अभ्यासक्रम होय.
- उमेदवार म्हणजे बारावी (१०+२) उत्तीर्ण (विज्ञान शाखा ) आणि या अभ्यासक्रमास प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थी होय. हे प्रमाणक ९:१(९ महिला : १ पुरुष) याप्रमाणे राहील.
- महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई हे राज्य स्तरावर परिचर्या अभ्यासक्रम राबविणे, परिक्षा घेणे, गुणवत्ता नियमन करणारी शासनाच्या अधिनस्त संस्था होय.
- महाराष्ट्र परिचर्या परिषद ,मुंबई हे राज्यस्तरावर परिचर्या प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणाची नोंदणी व नुतनीकरण करणारी शासनाच्या अधिनस्त कार्यरत स्वायत्त संस्था होय.

## ३) <u>प्रवेश प्रक्रियेचे सक्षम प्राधिकारी (Competent Authority)</u>:-

### १) राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रिया राबविणारी समिती:-

संपुर्ण प्रवेश प्रक्रियेचे आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान हे सक्षम प्राधिकारी, त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यामार्फत जिल्हास्तरीय निवड समितीने केलेल्या प्रवेश प्रक्रियेची तपासणी करतील व प्रवेश प्रक्रियेस अंतिम मान्यता देतील. यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त केली आहे. प्रवेश प्रक्रियेबाबत कोणताही मुद्दा उपस्थित झाल्यास सक्षम प्राधिकारी (आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक ) निर्णय घेतील व त्यांचे निर्णय अंतिम असुन सर्व उमेदवारांस बंधनकारक राहतील.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान | अध्यक्ष |
| मा.संचालक-१, आरोग्य सेवा, मुंबई | सदस्य |
| उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) | सदस्य सचिव |
| सहायक संचालक (शुश्रृषा) | सदस्य |
| मुख्य प्रशासकिय अधिकारी | सदस्य |

### २) <u>जिल्हास्तरीय प्रवेश प्रक्रिया राबविणारी समिती</u>:-

जिल्हा स्तरावर गुणवत्ता यादीतील उमेदवारांची मुळकागदपत्रे तपासणी करीता शासनाने खालीलप्रमाणे समिती नियुक्त केली आहे.

१) जिल्हा शल्य चिकित्सक — अध्यक्ष
२) अधिसेविका (संबंधीत रुग्णालय) — सदस्य
३) जिल्हा समाज कल्याण अधिकारी — सदस्य
४) प्रकल्प अधिकारी, (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) — सदस्य
५) मुख्य प्रशासकिय अधिकारी/प्रशासकिय अधिकारी (संबंधित रुग्णालय) — सदस्य
६) शुश्रृषा अधिकारी /वरिष्ठ पाठयनिर्देशिका — सदस्य सचिव

## ४) जिल्हा निहाय जागा वाटप:-

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त असलेल्या २३ जीएनएम परिचर्या प्रशिक्षण केंद्रामध्ये ४० या प्रमाणे जागा वाटप करण्यात आलेल्या आहेत.

- उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

| अ. क्र. | परिचर्या प्रशिक्षण संस्थाचे नाव | जागा | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा प्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | टक्केवारी | | १३.० % | ७.० % | ३.० % | २.५ % | ३.५ % | २.० % | २.० % | १९.०% | १०.० % | ३८% |
| १ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, ठाणे | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. रायगड | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ३ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. सातारा | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ४ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. सिंधुदुर्ग | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ५ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. रत्नागिरी | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ६ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. नाशिक | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ७ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. जळगाव | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |

| अ. क्र. | परिचर्या प्रशिक्षण संस्थाचे नाव | जागा | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा प्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. अहमदनगर | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ९ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. नंदुरबार | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १० | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, सा.रु.मालेगाव जि. नाशिक | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| ११ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. जालना | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १२ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. परभणी | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १३ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु. हिंगोली | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १४ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.बीड | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १५ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.नांदेड | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १६ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.उस्मानाबाद | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १७ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.वाशिम | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १८ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.सा.रु.अमरावती | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| १९ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.स्त्री.रु.अमरावती | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २० | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.चंद्रपुर | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २१ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.भंडारा | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |

| अ. क्र. | परिचर्या प्रशिक्षण संस्थाचे नाव | जागा | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा प्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.गडचिरोली | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |
| २३ | परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जि.रु.गोंदिया | ४० | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ८ | ४ | १५ |

टिप - अपंग व्यक्तिंसाठी एकूण जागांपैकी ५ टक्के जागा आरक्षित असेल तसेच अनाथ व्यक्ति करीता अनाथ पदाची गणना पदभरतीच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध पदसंख्येच्या १% राहील. (शासन निर्णय क्रमांक - अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दि. २३.८.२०२१)

**५) जागांचे आरक्षण:-**

- सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्थ असलेल्या २३ जीएनएम परिचर्या प्रशिक्षण केंद्राची सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासुन प्रवेश प्रक्रिया राबविताना शासनाने विहित केलेल्या शैक्षणिक आरक्षणानुसार आरक्षण ठेवण्यात आलेले आहे.
- सदर जागा वाटपाबाबत पुरुष उमेदवारांचे प्रमाणक ९: १ ( ९महिला : १ पुरुष ) असे असेल
- तसेच एएनएम आरक्षणबाबतची निवड एएनएमच्या गुणवत्तेनुसार करण्यात यावी. एएनएम करिता ५ टक्के जागा आरक्षित राहतील.
- शैक्षणिक अर्हता प्राप्त आशा उमेदवारांसाठी २ जागा राखीव असतील त्यांची निवड त्यांच्या गुणवत्तेनुसार करण्यात यावी. आशा उमेदवारांसाठी त्यांची सलग तीन वर्ष सेवा होणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्यात समबंध आल्यास ज्याचे तीन वर्षाचे एकत्रित मानधान जास्त राहील अशा आशा उमेदवारांची निवड करण्यात येईल.
- अपंग आरक्षण :-

  इंडियन नर्सिंग कॉन्सिलच्या पत्र क्र. एफनं.१-५/२०१८आयएनसी दि.१९.०४.२०१९ च्या परिपत्रकानुसार “For Disabled candidates: ५% Disablity of locomotor to the tune of ४०% to ५०% of the lower extremity”. या अपंग आरक्षणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

## ६) प्रवेश अर्ज शुल्क आकारणी:-

a) **प्रवेश अर्ज शुल्क** - खुला प्रवर्गासाठी रु.५००/- (रुपये पाचशे फक्त)
राखीव प्रवर्गासाठी रु.२५०/- (रुपये दोनशे पन्नास फक्त)

निवड झालेल्या उमेदवारांना भोजन खर्च, पुस्तके, स्टेशनरी, गणवेश इत्यादी खर्च स्वत: करावा लागेल, तसेच नोंदणी शुल्क ( Enrollment fees) , परिक्षा शुल्क, एसएनए सदस्यता विहित शुल्क संस्थेत भरणा करावा लागेल.

b) **शैक्षणिक शुल्क -**

या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या दरानुसार राहील. निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम सत्राचे अभ्यासक्रम शुल्क प्रवेशाच्या वेळीच भरावे लागेल. त्यानंतर प्रत्येक सत्राच्या प्रारंभी निर्धारित शुल्क भरावे लागेल. प्रवेश शुल्क भरल्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्राहय धरल्या जाईल.

शैक्षणिक शुल्क वैद्यकिय शिक्षण व संशोधन, शासन निर्णय क्रमांक एएमसी१००७/६२८/प्र.क्र.१४८/०७/शिक्षण २ दि.०१.०३.२०११ प्रमाणे आकारण्यात येते त्यानुसार या शैक्षणिक वर्षापासुन एएनएम व जीएनएम या अभ्यासक्रमासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क घेण्यात यावे.

| अ.क्र. | शैक्षणिक शुल्काचा तपशिल | शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | रु.१५००/- |
| २ | पाठय शुल्क | रु.१०५०/- |
| ३ | ग्रंथालय अनामत ( परतावा योग्य) | रु. २०००/- |
| ४ | वस्तीगृह भाडे | रु.४०००/- |
| ५ | जिमखाना / कल्चरल शुल्क (वार्षिक) | रु.५००/- |
| ६ | ग्रथांलय शुल्क (वार्षिक) | रु. १०००/- |
| ७ | संकिर्ण (वार्षिक) | रु५००/- |
| | **एकुण** | **रु.१०५५०/-** |

## ७) शैक्षणिक अर्हता:-

- शासन पत्र क्रमांक प्रवेश-२०२३/प्र.क्र.४४०/से-५ दि. १५.०६.२०२३ नुसार, जीएनएम या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सर्वसाधारण तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी देखिल बारावी विज्ञान शाखेत ( जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र सह ) किमान ४५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक असेल.

## ८) <u>निवड झालेल्या उमेदवारांना कागदपडताळणी करीता सादर करावयाची कागदपत्रे</u>:-

- शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा दाखला
- १० वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- अर्हताकारी परिक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले त्याबाबतचे शाळा/ महाविद्यालयाचे प्रमाणपत्र ( Attempt Certificate)
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
- जन्म व भारतीय नागरिकत्वाचा दाखला(Age, Nationality Certificate)
- जात प्रमाणपत्र
- जातवैद्यता
- नॉन क्रिमीलेअर दाखला
- शासकिय रुग्णालयातील सक्षम वैद्यकिय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले वैद्यकिय प्रमाणपत्र ( सोबतच्या विहित नमुन्यानुसार)
- आधार कार्ड
- राखीव गटातील उमेदवारांनी आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रेअर्जासोबत सादर करावीत.

वरील सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती प्रवेशाच्या वेळी आणणे आवश्यक आहे. तसेच समुपदेशनाच्या वेळी सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रतीची छाननी करण्यात येईल.

## ९) <u>वयोमर्यादा</u>:-

दि.३१.०८.२०२३ रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त असु नये.

## १०) <u>गुणवत्ता</u>:-

प्राप्त झालेल्या पात्र अर्जातुन उमेदवारांची निवड अर्हता परिक्षेत मिळविलेल्या एकुण गुणांवर आधारीत गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

**<u>समबंध</u>:-**

एकापेक्षा जास्त उमेदवारांचे समान गुण झाल्यास त्यामधुन उमेदवारांची गुणानुक्रमे निवड ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात येईल.

- प्रथम प्राधान्यक्रम जो उमेदवार १२ वी विज्ञान शाखेतील फिजिक्स, केमिस्ट्री व बायोलॉजी या शास्त्र विषयामध्ये एकत्रिक गुण जास्त असलेल्या उमेदवारास राहील.
- द्वितीय प्राधान्यक्रम ज्या उमेदवाराचे १२ वी परिक्षेतील इंग्रजीविषयाचे जास्त गुण असतील त्यास राहील.
- तृतीय प्राधान्यक्रम ज्या उमेदवाराचे १० वी परिक्षेतील एकुण गुण जास्त असतील त्यास राहील.

**राखीव उमेदवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण असेल -**

| अ.क्र. | प्रवर्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व बौध्द धर्मातरीत अनुसूचित जाती (अ.जा) | १३.० |
| २ | अनुसूचित जमाती ( निर्देशित क्षेत्रांच्या बाहेर राहणा-यांसह ) (अ.ज.) | ७.० |
| ३ | निरधि सूचित जमाती ( अ ) विमुक्त जाती ) वि.जा. ( अ) | ३.० |
| ४ | भटक्या जमाती - (ब) भ.ज. ( ब) | २.५ |
| ५ | भटक्या जमाती - (क) भ.ज. ( क) | ३.५ |
| ६ | भटक्या जमाती - (ड) भ.ज. ( ड) | २.० |
| ७ | इतर मागास वर्ग ( इमाव ) | १९.० |
| ८ | आर्थिक दुर्बल घटक | १०.० |

- **आंतर प्रवर्ग गट - ( Inter-se merit )**

**गट - १**

१ ) अ.जा. व बौध्द धर्मातरीत राहतील

२ ) अ.ज.( निर्देशित क्षेत्रांच्या बाहेर राहणा-यांसह )

**गट - २**

१ ) वि.जा. ( अ)

२ ) भ.ज. ( ब)

**गट -३**

१ ) भ.ज. ( क)

२ ) भ.ज. ( ड)

३) इ.मा.व.

## ११) <u>वसतीगृह सुविधा</u>:-

परिचर्या प्रशिक्षण केंद्रातील जीएनएम प्रशिक्षणार्थीना वसतीगृहात राहणे बंधनकारक आहे. तथापि ज्या वसतीगृहातील इमारत राहण्यायोग्य नसेल त्या ठिकाणी पर्यायी शासकिय इमारत / कर्मचारी शासकिय निवासस्थान उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रयत्न करावेत. अगदीच अशक्य झाल्यास संबंधित विद्यार्थ्यानीच्या पालकांनी त्यांच्या जबाबदारीवर वसतीगृहात न राहणे हा पर्याय स्वीकारला तर त्याबाबत रितसर पालकांच्या परवानगी व संमतीपत्रानुसार त्यांना घरी अनिवासी प्रशिक्षणाची अनुमती देण्यात यावी. तसेच पुरुष उमेदवारांना स्वत:ची सोय स्वत: करावी लागेल.

जेवणाची सोय पुर्णत: शासनाकडुन होणार नाही जेवणासाठी विद्यार्थिंनीना क्लब सिस्टीम द्वारे ठरवुन प्रतिमहा ठराविक रक्कम एकत्रिक (अंदाजे रु.१०००/- ते रु. १५००/-) जमा करुन शासनाच्या स्वयंपाकी यांचे कडुन स्वयंपाक करवुन घेतला जाईल.

- विद्यार्थ्यांचा आहाराचा दर्जा राखण्यासाठी खालील प्रमाणे आहार समिती गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| अधिसेविका | अध्यक्ष |
| परिचर्या अधिकारी/वरिष्ठ पाठयनिर्देशिका | सदस्य |
| सहाय्यक अधिसेविका | सदस्य |
| रुग्णालयाचे आहार तज्ञ | सदस्य |
| वॉर्डन | सदस्य सचिव |
| विद्यार्थी प्रतिनिधी | सदस्य |

या समितीने विद्यार्थ्यांचे दैनंदिन आहार नियोजन व खर्चाचा ताळमेळ ठेवावा व त्याबाबतच्या नोंदी अद्यावत ठेवाव्यात. यासाठी परिचर्या प्रशिक्षण केंद्र उपहारगृह या नावाने परिचर्या अधिकारी व विद्यार्थी प्रतिनिधी यांचे संयुक्त बॅक खाते उघडावे. दैनंदिन आहार नियोजनावर सर्व समिती सदस्यांच्या सहया बंधनकारक आहेत.

- वसतीगृहाचे दरवाजे साधारणतः कामकाजाचे तास पाहुन रात्री ८ नंतर बंद करावेत. त्यानंतर कोणासही प्रवेश देण्यात येऊ नये.
- दररोज सकाळी ७.३० व सकाळी ८ वाजता वसतिगृहात प्रार्थना, परिचर्या प्रतिज्ञा व राष्ट्रगीत घेऊन विद्यार्थ्यीनींची हजेरी घेऊन नोंद ठेवावी.

## १२) विद्यावेतन:-

निवड झालेल्या प्रशिक्षणार्थिंना शासन नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेले विद्यावेतन दरमहा दिले जाईल.

## १३) शिस्त व वर्तणुक:-

**(अ)प्रशिक्षणा दरम्यानप्रशिक्षण केंद्र व रुग्णालयात पाळावयाचे नियम:-**

परिचर्या प्रशिक्षण हा अभ्यासक्रम इतर अभ्यासक्रमापेक्षा पुर्णतः वेगळा आहे . त्याअनुषंगाने परिचर्या प्रशिक्षण केंद्रात विहित केलेले नियम प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना बंधनकारक आहेत. प्रत्यक्ष रुग्णावर प्रात्याक्षिक करावे लागते त्यामुळे प्रत्येक विद्यार्थिनीने परिचर्या अभ्यासक्रम जबाबदारीने पुर्ण करणे आवश्यक आहे.यासाठी पालकांनी आपल्या पाल्याकडुन खालील नियमांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी. तसे प्रतिज्ञापत्र विद्यार्थ्यी व पालकांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रवेश घेते वेळी सादर करावे.

१) विद्यार्थ्यांविरुध्द कोणत्याही गुन्हयाची नोंद किंवा न्यायलयीन प्रकरण प्रलंबीत असु नये याबाबत खोटी माहिती दिल्याचे आढळुन आल्यास प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणातुन काढुन टाकण्यात येईल.

२) विद्यार्थ्यांनींना वर्गात व रुग्णालयामध्ये मोबाईल फोन वापरण्यास सक्त मनाई आहे.

३) महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी नेमुन दिलेल्या सार्वजनिक सुट्टया व्यतिरीक्त कोणतीही रजा अनुज्ञेय राहणार नाही. तसेच प्रशिक्षण कालावधीत विवाह/ गरोदरपण असल्यास विहीत कालावधीत प्रशिक्षण पुर्ण करणे हि सर्वस्वी प्रशिक्षणार्थींची जबाबदारी राहील.

४) विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कालावधीत वारंवार सुट्टीवर जाऊ नये व पालकांनी त्यासाठी दबाव आणू नये.

५) विद्यार्थी प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही कारणास्तव लेक्चरला गैरहजर असल्यास तसेच परिक्षेसाठी उपस्थितीचे दिवस कमी पडल्यास तिला/त्याला महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ नियमानुसार परिक्षेला बसता येणार नाही.

६) भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या नियमांचे पालन विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

७) शैक्षणिक सहली,भेटी, ग्रामिण अनुभव, आऊटपास इ. साठी बाहेर गेल्यावर एखादी दुर्घटना घडल्यास त्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

८) प्रशिक्षणा दरम्यान विद्यार्थ्यांनीने कोणतेही बेकायदेशीर/अनैतिक कृत्य केल्यास त्या विद्यार्थिनीवर त्याची संपुर्ण जबाबदारी वैयक्तिकरित्या राहील व तिला प्रशिक्षणातुन काढण्यात येईल. तसे अधिकार संस्थाप्रमुखांना असतील.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०२/०४/२००८ च्या आदेशान्वये लिंगडोह समितीच्या रॅगिंग विरोधी शिफारसीनुसार तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४.१२.२००९ च्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

- प्रशिक्षणार्थी/ विद्यार्थी रॅगिंगच्या कृत्यामध्ये दोषी आढळल्यास त्याला निलंबितकेलेजाईल. तसे शपथपत्र लिहुन घेतले जाईल.
- खालील प्रमाणे रॅगिंग विरोधी समिती गठीत आहे.

| | |
|---|---|
| जिल्हा शल्य चिकित्सक | अध्यक्ष |
| अधिसेविका | सदस्य |
| परिचर्या अधिकारी | सदस्य सचिव |

- नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना उपरोक्त समिती सदस्यांचे दुरध्वनी क्रमांक दिले जातील.

महाराष्ट्र शासनाच्या सन १९९९ च्या रॅगिंग विरोधी कायद्याचे पालन करणे सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे.

९) अतंर्गत मुल्यमापनाकरिता वेळोवेळी चाचणी परिक्षा, केसस्टडी, केस प्रेझेंटेशन , नर्सिंग केअर प्लान, प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादी घेतल्या जातील, त्या वेळोवेळी पुर्ण करणे बंधनकारक राहील. त्यामध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, अन्यथा अंतिम परिक्षेस बसता येणार नाही.

१०) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी दर ६ महिन्यांनी एक या प्रमाणे एका शैक्षणिक वर्षात किमान २ पालक सभा घेण्यात येतील. यासाठी पालकांनी उपस्थितीत राहणे बंधनकारक राहील.

११) विना परवानगी घरी राहील्यास १ दिवस गैरहजेरीसाठी १:१ याप्रमाणात वार्षिक रजा कपात करण्यात येईल.

१२) मंजुर सुट्टीपेक्षा जास्त दिवस गैरहजर असल्यास पुन्हा प्रशिक्षणाकरिता हजर होताना पालकांनी स्वतः प्रशिक्षणार्थ्यास प्राचार्यासमक्ष आणुन हजर करावे.

१३) प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला वर्ग व आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवणे. तसेच वर्गाच्या व इमारतीच्या भिंतीवर लिखाण करु नये, रंग उडवु नये. (विशेषतः धुलीवंदनाच्या दिवशी )

१४) नेमुन दिलेल्या वॉर्ड व्यतिरीक्त इतरत्र फिरु नये. तसेच सुटटी असेल तेव्हा रुग्णालयामध्ये अथवा रुग्णालयाच्या आवारामध्ये विनाकारण फिरु नये.

१५) सर्व विद्यार्थ्यांनी वॉर्ड मधुन वेळेत क्लासरुममध्ये येण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील.

१६) कक्ष अनुभव घेण्यासाठी कक्षात जाताना संपुर्ण गणवेशामध्येच जावे. यामध्ये सफेद सलवार कमीज , ॲप्रन, सफेद बुट, पायमोजे व पाउच मध्ये सर्व शैक्षणिक साहित्य असणे अनविार्य आहे.

१७) सर्व प्रशिक्षाणार्थ्यीचे दर महिन्याला तिस-या शनिवारी मानसोपचारतज्ञयांचेकडुन समुपदेशन करण्यात येईल. तसेच प्रशिक्षणार्थ्यीना त्यांच्या काही वैयक्तिक बाबी तसेच कुठल्याही प्रकारची गंभीर समस्या किंवा मानसिक त्रास जाणवल्यास त्याबाबत त्यांनी आई, वडील, सेस्थेतील वरिष्ठ अधिकारी किंवा मानसोपचार तज्ञ यांच्याकडुन समुपदेशन करुन घेण्यात येईल.

१८) प्रशिक्षाणार्थ्यीना प्रात्यक्षिक अनुभव, प्रशिक्षण केंद्र तसेच वसतिगृहा संबंधित काही समस्या असल्यास त्वरीत संबंधित वरिष्ठांशी संपर्क साधावा.

१९) प्रशिक्षणार्थ्यीच्या आई वडीलांनी वेळोवेळी आपल्या पाल्यांच्या संपर्कात राहुन यशस्वीरित्या प्रशिक्षण पुर्ण करण्यासाठी त्यांचे मनोबल वाढवावे. तसेच आपल्या पाल्यांना प्रशिक्षणासंबंधित काही समस्या आहे असे आढळुन आल्यास ताबडतोब संस्थेतील वरिष्ठ अधिका-यांशी त्वरीत संपर्क साधावा. **तसेच पाल्यांना ॲनड्राईड मोबाईल देण्यात येवू नयेत.**

२०) प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण काळात त्यांच्या वर्तणुकीमुळे संस्थेला त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

## <u>(ब) प्रशिक्षणादरम्यान वसतिगृहात पाळावयाचे नियम</u>

१) वसतिगृहाचा वापर फक्त विद्यार्थ्यीनीसाठीच आहे. इतर कोणत्याही व्यक्तींना वसतीगृहात राहण्यास सक्त मनाई आहे.

२) नातेवाईंकांनी भेटावयाचे नियम.

- विद्यार्थ्याला भेटायला येणा-या नातेवाईकांची नावे, पत्ते व फोटो, आधारनंबरसहित प्रशिक्षणासाठी हजर होताना देणे आवश्यक आहे. तसेच त्याच नातेवाईकांना भेटण्यास परवानगी देण्यात येईल, त्या व्यक्तीरिक्त इतर कोणासही भेटण्यास परवानगी मिळणार नाही व यासाठी कोणाचाही दबाब आणु नये.
- नातेवाईकांनी भेटावयाची वेळ आठवडयातुन दोनवेळा सायंकाळी ४ ते ६ व रविवारी सकाळी १० ते ६ या वेळेतच विद्यार्थ्यांना प्रतिक्षा दालनात भेटता येईल.
- तसेच आठवडयातुन एक दिवस विद्यार्थ्यांना ३ तासाचा आऊट पास देण्यात येईल.
- रुग्णालय परिसरामध्ये नातेवाईकांशी बोलत राहु नये. प्रशिक्षणार्थीना वसतिगृहात भेटण्यासाठी आई वडिल व सख्खे भावंड यांनाच परवानगी असेल व प्रत्येक भेटीची नोंद रजिस्टरमध्ये घेण्यात यावी. नातेवाईकांचे ओळखपत्र तपासूनच त्यांना प्रशिक्षणार्थीना भेटण्यास परवानगी देण्यात येईल.

३) विद्यार्थ्यांना आपल्या नातेवाईकास/मैत्रिणीस वसतिगृहातील खोलीत नेण्यास सक्त मनाई आहे.

४) वसतिगृहातील टेरेसला कुलुप असावे व त्याची चावी अधिसेविका/परिचर्या अधिकारी यांच्या ताब्यात असेल .

५) वसतिगृहात विजेची शेगडी व विद्युत उपकरणे वापरण्यास सक्तमनाई आहे. प्रशिक्षणार्थीनी खोलीमध्ये कोणत्याही प्रकारची अपायकारक वस्तू/ हत्यारे ठेवू नयेत तसे आढळल्यास सक्त कारवाई करण्यात येईल .

६) विद्यार्थ्याला एखादा गंभीर आजार असल्यास उदा. अपस्मार, गर्भाशय व मासिक पाळी संबंधित आजार, त्वचेचे आजार असल्यास विद्यार्थी व पालकांनी प्रवेशाच्यावेळी संस्थेला अवगत करावे.

७) आजारी विद्यार्थ्यांने वेळेत वर्गशिक्षक,सार्वजनिक आरोग्य परिचारीका, वॉर्डन यांना सुचित करुन उपचार करुन घेणे. एकटे रुमवर झोपुन राहु नये. विद्यार्थ्यांनीला ॲडमीट केल्यास पालकांना बोलविण्यात येईल. पालकांनी त्वरीत आपल्या पाल्याला भेटण्यास यावे.

८) सांसर्गिक रोग झाल्यास वसतिगृहातुन उपचारासाठी घरी पाठविण्यात येईल व रोग बरा झाल्याचे वैद्यकिय अधिका-याचे पत्र असल्याशिवाय हजर करुन घेतले जाणार नाही.

९) प्रशिक्षण काळात वैयक्तिक साहित्याची चोरी किंवा आपापसात झालेल्या भांडणाची पोलीस तक्रार वरिष्ठांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही.

१०) रुम काही कारणास्तव बदलावयाची असल्यास वॉर्डनला लेखी अर्ज करुन बदलुन घेता येईल.

११) वसतिगृहातील रिक्त खोल्यांना तसेच विनावापर खोल्यांनाही अंभ्यगत कक्ष (visiting room) आणि चेजिंग रुम यांनाही रात्री ८ नंतर कुलुप असावे वत्यांच्या किल्या वार्डनच्या ताब्यात असतील .

१२) रात्री १० वाजता वॉर्डन व कार्यरत नाईट सुपर यांनी वसतिगृहात रांऊड घेतील व सर्व विद्यार्थ्यी सुखरुप आहेत हे पहातील . तसेच आठवडयातुन एक दिवस वॉर्डन व सहाय्यक अधिसेविका यांनी प्रशिक्षणार्थीच्या वसतीगृहातील खोल्यांची तपासणी करतील .

१३) सुरक्षिततेच्या कारणास्तव वसतिगृहाच्या आवारात (प्रवेशद्वार, अभ्यागत कक्ष, मेस व जेवणाची खोली, प्रत्येक मजल्यावरील व्हरांडा इ.) सी.सी.टीव्हीची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

१४) वसतिगृहामध्ये तक्रार पेटी ठेवण्यात आलेली असून प्राप्त झालेल्या तक्रारीचे तक्रार निवारण समितीमार्फत वेळोवेळी निवारण करण्यात येईल .

१५) वसतिगृहामध्ये प्रशिक्षणार्थीशी संबंधित असलेल्या नोंदी(आहार पुस्तक, हजेरी पुस्तक, आऊट पास व नाईट पास यांचे पुस्तक, पालक भेटीचे पुस्तक, जमा खर्चाचे पुस्तक इत्यादी) वॉर्डन वेळोवेळी अद्यावत करतील .

१६) वसतिगृहामध्ये कुठेही तोडफोड/नासधुस करण्यास सक्त कारवाई करण्यात येईल.

१७) वसतिगृहात कोणत्याही स्वरुपाचा गोंधळ करु नये.

**१८) मेसमध्ये पाळावयाचे नियम.**

- सकाळी ७ ते ७:३० यावेळेतच चहा नाश्ता मिळेल.
- दुपारी ठरवुन दिलेल्या वेळेतच (१२ ते १) जेवण मिळेल.
- संध्याकाळचा चहा ४ ते ५ यावेळेतच मिळेल.
- रात्रीचे जेवण केवळ संध्याकाळी ७ ते ८ यावेळेतच मिळेल.
- जेवण केवळ आहारगृहातच करावे. रुमवर जेवण घेऊन जाऊ नये.
- आवश्यक असेल तेवढेच अन्न घ्यावे. अन्न वाया घालवु नये.
- उरलेले अन्न कचरा डब्ब्यामध्येच टाकावे. इतरत्र फेकु नये.
- मेस फी दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मेस क्लब मध्ये जमा करावी.

१९) पाण्याचा व विजेचा वापर काटकसरीने व आवश्यक तेवढा करावा. काम झाल्यावर नळ, पंखा व लाईट बंद करावेत.

२०) वसतिगृह आपले असल्यामुळे स्वच्छता ठेवावी. बाथरुम तुंबणार नाही याची काळजी घ्यावी.

## १४) <u>विद्यार्थ्यांचे स्थानांतर</u>:-

एका संस्थेत प्रवेश दिल्यानंतर प्रशिक्षण पुर्ण, होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना दुस-या संस्थेत स्थानांतर करता येणार नाही.

## १५) <u>विशेष सुचना</u>:-

- उमेदवाराना प्रवेशाच्या वेळी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित (ॲटेस्टेड) सत्यप्रती सादर कराव्यात. मुळ प्रमाणपत्रे प्रवेशाच्या वेळी पडताळणी करिता संस्थाप्रमुखांना सादर करावीत. एनरॉलमेंट/ आवश्यक पडताळणीनंतर मुळप्रमाणपत्रे उमेदवारास परत करण्यात येतील. मुळ प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांच्या छाननी किंवा पडताळणीच्या वेळी कोणत्याही त्रुटी, चुकीची माहिती किंवा गुणपत्रिकेत अनधिकृत खाडाखोड अथवा बदल केल्याचे आढळुन आल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज तात्काळ नाकारण्यात येईल. किंबहुना त्याला आधिच प्रवेश देण्यात आला असल्यास तो रद्द करण्यात येईल. प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे मुळ प्रमाणपत्रे हे कार्यालयात जमा करुन घेण्यात यावीत. कोणत्याही सबबीवर एनरॉलमेंट पुर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांना मुळ प्रमाणपत्रे परत देण्यात येवु नये. याची नोंद प्राचार्यानी घ्यावी.
- प्रवेशासाठी केलेल्या दाव्यानुसार आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे प्रवेशाच्यावेळी सादर करण्यात यावी. प्रवेश अर्जात केलेल्या दाव्याव्यतिरिक्त नंतर केलेला कोणताही दावा विचारात घेण्यात येणार नाही.

- प्रशिक्षणाकरीता पात्र ठरविण्यात आलेला उमदेवार शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. यारिता ज्या संस्थतेत उमेदवाराने अर्ज केलेला असेल, त्याच संस्थेत त्याची वैद्यकिय तपासणी केल्यानंतरच उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र ठरेल. वैद्यकियतपासणीत उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया अपात्र ठरल्यास प्रशिक्षणातुन काढुन टाकण्यात येईल. सदर तपासणी संस्था प्रमुखांनी एक महिन्यात करुन घेणे बंधनकारक राहील.
- एखादा प्रशिक्षणार्थी अर्धवट प्रशिक्षण सोडुन गेल्यास प्रशिक्षणाच्या मध्यावर दुस-याप्रशिक्षणार्थीलाप्रवेश देणे शक्य नसते,अशा प्रकारे जागा रिक्त राहून एका होतकरु गरजवंत उमेदवाराचे शैक्षणिक नुकसान होते. यास्तव प्रशिक्षण अर्धवट सोडुन गेल्यास व कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास **"लॅप्स ऑफ सीट"**चे शुल्क रु.५०,०००/- इतकी रक्कम दंड म्हणून वसुल करण्यात येईल.व सदर शुल्काची शासन पावती देण्यात येईल.

**************************

# महाराष्ट्र शासन

## आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

## सामान्य परिचर्या व प्रसाविका ( जी.एन.एम .)कालावधी ३ वर्ष

## (महिला उमेदवारांकरिता )

## प्रवेश अर्ज

## सन २०२३-२४

प्रवेश अर्ज क्र

Paste a
3.5cm ×4.5 cm
Size recent
photograph only

प्रवेश अर्ज मूल्य : रु ५००/(खुल्या प्रवर्गाकरीता )
प्रवेश अर्ज मूल्य : रु २५०/(राखीव प्रवर्गाकरीता )

---

**विशेष सूचना**- अ) अर्जदाराने अर्जातील प्रत्येक नोंद योग्य , संपूर्णपणे सुवाच्य व स्वहस्ताक्षरात भरणे आवश्यक आहे व अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकीत (अटेस्टेड) प्रती जोडलेल्या असाव्यात

ब ) प्रवेश अर्जात खाडाखोड करण्यात येऊ नये.

---

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

२) आईचे नाव :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

३) जन्म तारीख :- . . . . . . . . . . . . वय (३१ जुलै २०२३ रोजी ) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

४) स्थानिक पत्ता :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ईमेल:-.. . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . कायमचा पत्ता :- ( स्थानिक पत्ता पेक्षा वेगळा असल्यास ) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ..

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

५) राष्ट्रीयत्व :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

६) आपण महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात काय ? होय / नाही . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

अधिवास प्रमाणपत्र क्रमांक :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

अधिवास प्रमाणपत्र मिळाल्याचा दिनांक:- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

७) जातीचा तपशील :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

जातीचे नाव :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . प्रवर्ग :-. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

८) वैवाहिक स्थिति :- अविवाहित / विवाहित/ घटस्फोटीत . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

विवाहित असल्यास पतीचे नाव , पत्ता , व दूरध्वनी क्रमांक :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

९) वडील / पालक / पती यांचा व्यवसाय :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . .

१०) शैक्षणिक अहर्ता :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

| अक्र | अहर्ता | शाखा | मंडळ/ विद्यापीठ | निकालाची तारीख | प्रयत्न | एकुण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १० वी (ssc) | | | | | | | | |
| २ | १२ वी (HSC) | | | | | | | | |
| ३ | पदवी | | | | | | | | |

११) वर्तणूकीबाबत प्रमाणपत्रदेणा-या दोन व्यक्ति ची नावे व पत्ता :-

( वर्तणूक प्रमाणपत्र जोडावीत )

१)

२)

अर्जदाराची सही, पूर्ण नाव व दिनांक

## CERTIFICATE OF MEDICAL FITNESS

This is to certify that I have conducted clinical examination ofKum. ...................................................................................... whois desirous of admission to Nursing courses

He/she has not given any personal history of any disease incapacitating him/her to undergo the professional course. Also, on clinical examination it has been found that he/she is medically fit to undergo said course.

a) Absence of any incapacitating and /or progressive systemic disease / disorder/ condition,
b) Absence of any disability of upper limb/s,
c) Absence of any major visual/auditory disability,
d) Absence of psychosis/neurosis/mental retardation,
e) Ability to maintain erect posture,
f) Reasonable manual dexterity.

| | |
|---|---|
| Adress of the Registered Medical Practitioner | Signature |
| | Name |
| | Registration No |
| Date - / /2023 | Seal of Registered Medical Practitioner |

Note:

A candidate must be medically fit to undergo Fellowship/Certificate Course applied for. The medical fitness must be certified by a Registered Medical Practitioner in the prescribed Performa, as given above on a Letter head.